Cosmos Multidisciplinary Research E-Journal — Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal — Impact Factor 4.94 — ISSN No. 2456-1665

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अध्ययन सवयी, तणाव आणि शैक्षणिक संपादणूकीचे सहसंबंधात्मक अध्ययन

**प्रा. डॉ. दीपक रामदास बाविस्कर**
(एम.ए.,एम.एड्., एम.फिल.,सेट,पीएच. डी.)
अभय शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धुळे
ता. जि. धुळे

**प्रास्ताविक:**

जीवनात शिक्षणाला अधिक महत्वाचे स्थान आहे. शिक्षणाशिवाय व्यक्ती तसेच समाजाचा विकास होणे शक्य नाही. समाजाला तसेच राष्ट्राला पुढे नेण्यासाठी शिक्षणव्यवस्थेतील महत्वाचा घटक म्हणून शिक्षकांकडे पाहिले जाते. शिक्षक हाच शिक्षण व विद्यार्थी यांच्यातील महत्वाचा दुवा मानला जातो. हा शिक्षकी व्यवसाय करु पाहणाऱ्या विद्यार्थी शिक्षकांच्या अध्ययन सवयी तसेच त्यांच्या शैक्षणिक संपादणूकीचा सहसंबंध अभ्यासून त्यांच्या व्यावसायीक विकासासाठी महत्वाचे मार्गदर्शन करणे शक्य होणार आहे.

व्यक्तीच्या जीवनातील अनेक व्यवसायांपैकी शिक्षकी व्यवसायाला विशेष महत्व दिले जाते याचे कारणच राष्ट्राची पिढी घडविणारा कहत्वाचा घटक शिक्षक आहे हेच मानले जाते. असे महत्वाचे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य तसेच बौध्दिक क्षमता अधिक चांगले असणे महत्वाचे आहे. व्यक्तीला जीवनात अनेक गोष्टींचा ताण असतो त्याचा परिणाम त्याच्या वर्तनावर तसेच तो करत असलेल्या व्यवसायावर होतांना दिसतो. शिक्षकी व्यवसाय करणारा व्यक्ती आपला व्यवसाय योग्य प्रकारे करत नसल्याच त्याचा परिणाम त्या व्यक्तीवरतर होतोच त्या बरोबर शालेय विद्यार्थ्यांवरही त्याचा परिणाम मोठ्या प्रमाणात होतो. तसेच पुढे जाऊन हा परिणाम संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर व शिक्षण घेत असलेल्या संपूर्ण विद्यार्थी, पालक, समाज तसेच राष्ट्र यावरही होतांना दिसतो. कारण शिक्षकी व्यवसायाचा प्रत्यक्ष संबंध मानवी विकास, राष्ट्राचा विकास यांच्याशी येतो. म्हणूनच इतर व्यवसायांच्या मानाने शिक्षकी व्यवसायाला अधिक महत्व दिले जाते.

शिक्षकी व्यवसायकरु पाहणाऱ्या विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, बौध्दीक क्षमता अधिक योग्य पध्दतीने विकसित होणे आवश्यक आहे. व्यक्तीचा ताण हा सकारात्मक व नकारात्मक असा दोन्ही प्रकारचा असतो. एखाद्या गोष्टीचा ताण विशिष्ट पातळी पर्यन्त असल्यास तो सकारात्मक मानला जातो. मात्र हाच ताण जास्त क्लीष्ट झाल्यास तो नकारात्मक मानसिकतेकडे घेऊन जाणारा ठरतो. आणि ज्या व्यक्तीचा मानवी संबंधांशी प्रत्यक्ष संबंध येतो अशा व्यक्तीचा हा नकारात्मक ताण इतरांच्या तसेच स्वत: च्या विकासात अडथळा ठरू लागतो. हा ताण अनेक कारणांमुळे येऊ शकतो. विद्यार्थी शिक्षकांसाठी तो अध्ययनाच्या योग्य सवयी नसल्यास निर्माण होऊ शकतो. यासाठी विद्यार्थीदशेपासून अध्ययनाच्या योग्य सवयी जोपासणे आवश्यक असते.

अध्ययन सवयी योग्य असणे म्हणजे काय तर विद्यार्थ्याने दररोजचा अभ्यास दररोज करणे. अध्ययनासाठीच्या योग्य वेळा व फावला वेळ याचे योग्य नियोजन बद्ध वेळापत्रक आखने. वाचन, लेखन, सराव, मनन आदी सवयी योग्य पध्दतीने अंगवळणी करुन घेणे. यासाऱ्यांचे योग्य नियोजनबध्द, आखणी करुन कार्यवाही केल्यास विद्यार्थ्याची शैक्षणिक संपादणूक चांगल्याप्रकारे वाढू शकते त्यासाठी अध्ययन सवयी महत्वाच्या मानल्या जातात. अध्ययन सवयी चांगल्या असल्यास अध्ययनाचा ताण निर्माण होणार नाही. तसेच अध्ययनही प्रभावी होण्यास मदत होईल.

**संशोधनाची गरज किंवा महत्व : -**

शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षक प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पदवी, पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झालेले असते. मात्र आता त्यांना एक वेगळ्या प्रकारचे शिक्षण अर्थात व्यवसायीक शिक्षण घेण्याची वेळ असते. या प्रशिक्षणानंतर त्यांना शिक्षक म्हणून व्यवसाय करायचा आहे. प्रशिक्षण काळात त्यांना शिक्षक होण्यासाठीच्या सर्व गुणांचे प्रशिक्षण देण्याचा अभ्यासक्रमानुसार प्रयत्न केला जातो. मात्र अनेक विद्यार्थ्यांच्या अध्ययन सवयी योग्य नसल्यामुळे त्यांना प्रशिक्षणघेतांना ताण निर्माण होतांना दिसून येतो. त्यांनी आतापर्यन्त घेतलेले शिक्षण हे महाविद्यालयीन शिक्षण असले तरी ते विज्ञान शाखा सोडल्यास इतरांसाठी प्रात्यक्षिक कार्यावर भर देणारे शिक्षण नसते. मात्र शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आता प्रत्यक्ष प्रात्यक्षिक कार्यावर भर देणारे प्रशिक्षण त्यांना घ्यायचे आहे म्हणून त्यांना हे प्रशिक्षण घेतांना ताण निर्माण होतो.

प्रत्यक्ष शिक्षक प्रशिक्षणात नेतृत्व कौशल्य, प्रत्यक्ष सूक्ष्म अध्यापन, सराव पाठ, विविध प्रात्यक्षिक यांचा सराव स्वत: करावा लागतो. अशा वेळी प्रत्यक्ष अध्यापन करणे. विद्यार्थ्यांसमोर एकट्याने सादरीकरण करणे आदी सरावांचा त्याला ताण निर्माण होतो. घोकमपट्टी करुन अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणात ताण निर्माण होतो. म्हणूनच आजपर्यंतच्या अध्ययन सवयी त्याच्यासाठी योग्य ठरत नाही आणि याच गोष्टींचा ताण निर्माण होऊन त्यांना हे प्रशिक्षण तणावपूर्ण वाटू लागते. आणि त्याचाच परिणाम त्याच्या अध्ययन संपादणूकीवर होतांना दिसतो. असे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अध्ययन सवयींचा अभ्यास करुन योग्य अध्ययन सवयी त्याच्यात विकसित करण्यासाठी तसेच चांगल्या संपादणूकीसाठी मार्गदर्शक ठरु शकतील अशा उपायांची योजना करण्यासाठी सदर संशोधन गरजेचे आहे. शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना आपल्या अध्ययनाबरोबरच अध्यापनही करण्याची वेळ या ठिकाणी येते. अशा वेळी केलेले अध्ययन समोरच्या विद्यार्थ्यांसमोर मांडणे, त्यांना ते समजावून सांगणे, अध्यापन करणे या वेगवेगळ्या कौशल्यांची प्राप्त करणेसाठी चांगल्या अध्ययन सवयींची गरज असते. अशा अध्ययन सवयी निर्माण होण्यासाठी प्रशिक्षण काळात मार्गदर्शक ठरतील अशा उपायांची योजना करणेसाठी प्रस्तुत संशोधनाचे महत्व आहे.

**संशोधनाची उ‍ि‍ष्टे : -**

१. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मुले-मुली यांच्या अध्ययन सवयीचा शोध घेणे.

२. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मुले-मुली यांच्या ताण-तणावाचा शोध घेणे.

३. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मुले-मुली यांच्या संपादणूकीचा शोध घेणे.

४. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मुले-मुली यांच्या अध्ययन सवयी, ताणाव आणि शैक्षणिक संपादणूकीचा सहसंबंध शोधणे.

**परिकल्पना : -**

१. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अध्ययन सवयी आणि तणावामध्ये लक्षणीय सहसंबंध आढळून येत नाही.

२. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अध्ययन सवयी आणि संपादणूकीमध्ये लक्षणीय सहसंबंध आढळून येत नाही.

३. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या ताण तणाव आणि संपादणूकीमध्ये लक्षणीय सहसंबंध आढळून येत नाही.

**संशोधनाची कार्यपध्दती : -**

धुळे तालुक्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यायातील यादृच्छिक पध्दतीने १५० विद्यार्थ्यांची निवड सप्रयोजन पध्दतीने करण्यात आली. धुळे तालुक्यात एक शासकीय व पाच विनाअनुदानित असे एकुण सहा शिक्षणशास्त्र महाविद्यालये आहेत. संशोधनाचा आवाका व कालमर्यादा पाहता संशोधनाची मर्यादा निश्चित करण्यात आली असून सदर संशोधन धुळे तालुक्यातील तीन शिक्षणशास्त्र महाविद्यालयापुरतेच मर्यादित आहे.

**न्यादर्श निवड :-**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | विद्यार्थी/अध्ययनार्थी | | एकुण |
|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | |
| १. | अभय शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धुळे | २५ | २५ | ५० |
| २. | गंगामाई शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नगाव | २५ | २५ | ५० |
| ३. | आदर्श शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वलवाडी | २५ | २५ | ५० |
| | एकुण | ७५ | ७५ | १५० |

संशोधन विषयाचे स्वरुप लक्षात घेता सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. संशोधनासाठी खालील प्रमाणित चाचणीचा उपयोग केलाआहे.

१. विद्यार्थी ताण मापक चाचणी. - डॉ. एस. टी. जोशी आणि डॉ. जी. बी. चाधरी

२. अध्ययन सवय प्रश्नावली - प्रा. एन. के. चड्डा आणि डॉ. दिलीप सिंग

३. संपादणूक मूल्यमापनासाठी विद्यार्थ्यांचे पदवी परीक्षेचे गुण.

न्यादर्शातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्याकडून प्राप्त आधारभूत माहितीच्या विश्लेषणाकरीता, मध्यमान, प्रमाणविचलन, टी परीक्षण, सहसंबंध गुणक, विश्वसनियता गुणक या संख्याशास्त्रीय परिमाणांचा उपयोग केला आहे.

**चलातील सहसंबंध सार्थकता दर्शविणारी सारणी : -**

| अ. क्र. | चले | एकुण विद्यार्थ्यांची संख्या | सहसंबंध गुणकाचे मूल्य | सार्थकता स्तर ०.०१ |
|---|---|---|---|---|
| १. | अध्ययन सवयी आणि ताण - तणाव | १५० | - ०.२५ | सार्थक |
| २. | अध्ययन सवयी आणि संपादणूक | १५० | - ०.२९ | सार्थक |
| ३. | ताण - तणाव आणि संपादणूक | १५० | - ०.२३ | सार्थक |

१. शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या अध्ययन सवयी आणि ताण-तणाव या दोन चलात सामान्य स्वरुपाचा ऋणात्मक सहसंबंध असल्याचे आढळून आले.

२. अध्ययन सवयी आणि संपादणूक या दोन चलात चांगल्या स्वरुपाचा धनात्मक सहसंबंध असल्याचे आढळून आले.

३. विद्यार्थ्यांचा ताण - तणाव आणि संपादणूक या दोन चलात सामान्य स्वरुपाचा ऋणात्मक सहसंबंध असल्याचे आढळून आले.

**निष्कर्ष : -**

१. अध्ययन सवयी योग्य असणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये तणाव कमी आहे.

२. अध्ययन सवयी आणि संपादणूक यांचा संबंध सकारात्मक आहे.

३. तणाव कमी असणाऱ्या विद्यार्थ्यांची संपादणूक अधीक आहे.

**सारांश : -**

शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या अध्ययन सवयी आणि ताण तणाव चलाचा सहसंबंध गुणक - ०.२५ असून ०.०१ सार्थकता स्तरानुसार पडताळी केली असता हे चल सार्थक आहे. अध्ययन सवयी आणि संपादणूक या दोन चलात चांगल्या स्वरुपाचा धनात्मक सहसंबंध असून सहसंबंध गुणक -०.२९ आहे.

तसेच विद्यार्थ्यांचा ताण - तणाव आणि संपादणूक या दोन चलात सामान्य स्वरुपाचा ऋणात्मक सहसंबंध आढळून आला असून सहसंबंध गुणक - ०.२३ आहे. ०.०१ स्तर सार्थक आहे.

अध्ययन सवयी योग्य असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अध्ययनाचा ताण निर्माण होत नाही. ताण निर्माण न झाल्यामुळे अध्ययन निष्पत्ती, संपादणूक वाढण्यास मदत होते. अध्ययन सवयी आणि संपादणूक यांचा संबंध सकारात्मक असल्यामुळे अध्ययनाचा चांगला फायदा होतो.

**ग्रंथ सूची : -**

१. करंदीकर, सुरेश, (१९९७) 'शैक्षणिक मानसशास्त्र' फडके प्रकाशन, कोल्हापूर

२. दांडेकर, वा. ना. (२००२) 'शैक्षणिक व प्रायोगिक मानासशास्त्र ', श्री. विद्या प्रकाशन,पुणे

३. मुळे, रा. श. आणि उमाटे वि. तु. (१९९८) 'शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे ', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर.